महसूल विभाग

## तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना प्रवासभत्ता मिळणार

तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना १२७५ रुपये प्रति महिना याप्रमाणे कायमस्वरुपी प्रवासभत्ता देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांना हा प्रवास भत्ता मिळेल.

तलाठ्यांना सातत्याने फिरावे लागते. विविध बैठका, न्यायालयीन प्रकरणे, त्याचप्रमाणे वरिष्ठ कार्यालयात हजर रहावे लागते. आपत्कालीन परिस्थितीत पंचनामे करण्यासाठी गावे आणि पाड्यांमध्येही जावे लागते. त्यादृष्टीने असा भत्ता देण्यात यावा अशी संघटनेची मागणी होती. प्रवास भत्त्यापोटी शासनावर प्रतिवर्षी २३ कोटी रुपये इतका बोजा पडेल. सध्या २२०४ मंडळ अधिकारी आणि १२,६३७ तलाठी कार्यरत आहेत.